Vol 4 Issue 2 Nov 2014

ISSN No : 2249-894X

## Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

Review Of Research
ISSN:-2249-894X
Impact Factor : 2.1002 (UIF)
Vol. 4 | Issue. 2 | Nov. 2014
Available online at www.ror.isrj.org

# सतवाहन – दक्षिण भारतातील एक महान राजवंश

**Gopinath B. Sarang**

HOD of History,I.C.S College, Khed , Dist.- Ratnagiri , Maharashtra.

***सारांश :-***'दक्षिणेत मौर्यानंतर सातवाहनांची सत्ता प्रस्थापित झाली. सातवाहन सत्तेच्या सुरुवातीच्या काळाविषयी विद्वानांमध्ये वेगवेगळे विचार आढळून येतात. काही विद्वानांच्या मते कण्व घराण्याकडून चालविले जाणारे मगधाचे साम्राज्य डळमळीत झाल्यावर त्याचा शेवट करुन सातवाहन घराणे सत्तेवर आले. हा विचार प्रवाह मान्य केल्यास सातवाहनाचा उदय इ. स. पू पहिल्या शतकात झाला असे दिसून येते.[1] परंतु डॉ. वा. वि. मिराशी यांचे मते 'अशोकाच्या सत्तेचा शेवट झाल्यावर लगेचच दक्षिणेत सातवाहन सत्तेवर आले. हे असे दर्शवते की, इ.स.पू तिसऱ्या शतकाच्या उत्तरार्धात सातवाहन सत्तेवर आले.[2] डॉ मिराशीच्या या विचाराला डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे यानी दूजोरा दिला आहे. डॉ सहस्त्रबुद्धेच्या मते पुष्यमित्रा नतंर मगधामध्ये प्रबळ राजा नव्हता. त्यामुळे कण्वाच्या अधिपत्याखालील मगधाच्या सत्तेचा मगध प्रदेशाच्या बाहेरील प्रदेशावर अंमल नव्हता. उलटपक्षी सातवाहनांनी इ.स.पू 236 सम्राट अशोकाच्या मृत्युनंतर दक्षिणेत आपली सत्ता आकाराला आणली.[3] पुराणानी या महान राजवंशाचा संस्थापक सिमुक याचा संबंध चूकीने नतंरच्या सातवाहन राजांच्या कर्तृत्वाशी जोडला आहे. सातवाहनाच्या सत्तेवर येण्याच्या निश्चित तारखे विषयीचा विवाद अजूनही गुंतागुंतीचा बनला आहे. डॉ भांडारकरांच्या मते या राजघरण्यातील प्रामुख्याने सातवाहनाच्या वेगवेगळया शाखांच्या 29 किंवा 30 राजांचा उल्लेख पुराणामध्ये आहे, जे एकाच वेळी दक्षिणेत वेगवेगळया भागात राज्य करीत होते.[4] पुराणांच्या वंशावळीत नमूद नसलेल्या या घराण्यातील काही राजांच्या सापडलेल्या नाण्यांवरुन डॉ. भांडारकरांच्या विचाराला पुष्टी मिळते.

***प्रस्तावनाः–***

पुराणांमध्ये सातवाहन घराण्याचा एकून कालखंड 300 पासून ते 460 वर्षे असा बदलता नमूद केलेला आहे. सर्व सातवाहन राजांच्या बाबतीत अभिलेखिय आणि नाणेशास्त्रीय पुरावे अजूनही प्रकाशात आलेले नाहीत; ही आणखी एक लक्ष वेधणारी गोष्ट आहेत. सातवाहन इ.स. पू तिसऱ्या शतकाच्या सुरुवातीपासून दक्षिणेत मौर्याचे सबऑर्डीनेट म्हणून राज्यकारभार करीत असावेत. मौर्याच्या ऱ्हासाच्या प्रक्रियेबरोबरच ते अधिकाधिक प्रबळ बनत जाउन साधारणतः इ.स.पू. पहिल्या शतकाच्या मध्यावर उत्तरेकडील मौर्याच्या वारसादाराची सत्ता झुगारुन स्वतंत्र राज्यकर्ते म्हणून उदय पावले.

सिमुकापासून ते शिवस्वाती या पहिल्या 22 राजांचे वर्णन सुरुवातीचे सातवाहन राजे असे करण्यात येते तर गौतमीपुत्र सातकर्णी पासूनच्या शेवटच्या आठ राजांना नतंरचे किंवा उत्तरकालीन सातवाहन राजे म्हणण्यात येते. सातवाहन घराण्यातील सुरुवातीच्या राज्यकर्त्या पैकी सिमुक हा निश्चित एक महान राज्यकर्ता होता. कण्व सत्तेचा शेवट करुन नवीन महान सत्तेचा पाया घालणारा म्हणून पुराणांमध्ये त्याचा गौरव करण्यात आला आहे. डॉ. मिराशीच्या मते सिमुकाच्या अगोदर सातवाहन नावाचा राजा होउन गेला.[5] हे अनुमान फक्त 'राजा सातवाहन' नांव असलेले नाणे आढळल्यावर काढण्यात आले आहे. अर्थात काहीही बाब असली तरी, सिमुक हा खऱ्या अर्थाने

सातवाहन घराण्याचा संस्थापक आहे याबाबत दुसरे कोणतेही मत नाही. त्याचे नांव असलेली काही नाणी अलिकडेच आढळून आली आहेत. अशा प्रकारे त्याची कारकीर्द ही साहित्य, आलेख त्याच प्रमाणे नाणेशास्त्रीय पुराव्यानिशी सिद्ध होणारी आहे. त्याचे राज्य पुणे जिल्हयात जुन्नर इथे प्रस्थापित झाले होते. सुरुवातीच्या कालखंडात सातवाहनाची राजधानी जुन्नर इथेच होती. हे मत सत्य वाटणारे आहे. कारण सातवाहनाचे सुरुवातीचे आलेख जुन्नर जवळ नाणेघाटात[6] आढळत असून त्यापैकीच एका आलेखात सिमुकाचे नांव नोंद करण्यात असलेले आहे. जुन्नर शहर सहयाद्रीच्या पूर्व बाजूला वसलेले आहे, जे कोकणातील सखल भागाशी नाणे घाटातून जोडलेले होते.

सिमुकानंतर त्याचा लहान भाउ कृष्णा सातवाहन गादीवर आला. फक्त नाशिक आलेखात त्याचे नांव नमूद करण्यात आलेले असून त्याशिवाय या राजाबद्दल आपल्याला विस्तृत अशी माहिती उपलब्ध होत नाही. कृष्णा नंतरचा पहिला सातकर्णी हा सुरुवातीच्या राज्यकर्त्यांपैकी महान शासनकर्ता होता. नाणेघाट आलेख हा त्याच्या भरभराटीच्या कारकीर्दीची साक्ष आहे.[7] हा आलेख प्रत्यक्षात त्याची राणी नायनिका किंवा नागनिका हीने जारी केला आहे, नाणेघाट आलेखात राणी नागनिकेने तिच्या पित्याचे नांव महारथी त्रनकाईरा (Maharathi Tranakayira) असे नमूद केले आहे. सातवाहन राजांच्या नावांच्या बरोबरीने त्याच्या नांवाचा समावेश होणे हे निश्चित असे सूचविणारे आहे की सातवाहनांच्या भरभराटीमध्ये त्याचेही योगदान होते. महारथीची मुलगी असलेल्या नागनिके बरोबर झालेला विवाह सातकर्णी पहिला याला मोठया प्रमाणावर फायदेशीर ठरला ही बाब डॉ. मिराशी यानी योग्यपणे निदर्शनास आणली आहे.[8] पश्चिम महाराष्ट्रातील गुंफा मदीरांतील सुरुवातीच्या आलेखांमध्ये महारथीज् आणि महाभोज यांची नांवे नोंद करण्यात आली आहेत; जे सहयाद्रीच्या परिसरात छोटेशे मांडलिक राजे होते.[9] नागनिकेबरोबरच्या सातकर्णीच्या विवाहाने काही प्रमाणात सातवाहन राज्याला प्रादेशिक फायदा झाला.

पुराणांच्या वंशावळीमध्ये नंबर 17 वर नांव असलेला हाल हा सातकर्णी पहिला नंतर होउन गेलेला सर्वात प्रसिद्ध सत्ताधिश होय. तो कला आणि साहित्याचा महान आश्रयदाता होता. प्रसिद्ध प्राकृत ग्रंथ गाथा सप्तसती ही त्याचीच निर्मिती आहे. तो विविध कवीनी रचलेल्या 700 कवितांचा संचय आहे. या ग्रंथात गोदावरीच्या तीरावर वास्तव्य असलेल्या सामाजिक जीवनाचे समृद्ध आणि रसभरीत वर्णन करण्यात आले आहे. यावरुन हलाने सातवाहन सत्तेची किर्ती राखली होती हे स्पष्ट दिसून येते.[10]

पुराणांच्या यादीत नंबर 23 वर नमूद केलेला राजा गौतमीपुत्र सातकर्णी बहुधा सर्व सातवाहन राजांमध्ये श्रेष्ठ राजा होता. या राजाचे अनेक आलेख सापडले आहेत. पूर्वजांच्या गेलेल्या राज्यावर गौतमीपुत्राने विजय मिळविल्याचे त्याच्या आलेखात नोंदलेले आहे. आपल्या राज्यावर गौतमीपुत्राने विजय मिळविल्याचे त्याचा स्वतःचा आलेख त्याच बरोबर नाणी यावरुन सिद्ध होते. गौतमीपुत्र सातकर्णीने महाराष्ट्राच्या पश्चिम किना-यावर विजय मिळविला होता, याबाबतील ही गोष्ट कोणताच संशय मागे ठेवीत नाही.

सातवाहन कालगणनेचा विचार करता गौतमीपुत्र सातकर्णी हा एकमेव सातवाहन राजा आहे की ज्याच्या कारकीर्दीचा कालखंड समकालीन अधिकृत साधनांवरुन पक्का करता येतो. महान कुशान सम्राट कनिष्काशी संबंध जोडण्यात येणा-या शक संवताच्या आधारावर ही कालगणना आहे.[11] बहुतेक विद्वानानी हा विचार मान्य केलेला आहे. त्यानुसार कनिष्काने हा शक संवत इ.स. 78 साली सुरु केला.

वशिष्टीपुत्र पुलुमावी हा या राजघराण्याचा दुसरा महत्त्वाचा राजा होता, ज्याचे नांव टॉलेमीने पैठणचा राजा असे नमूद केले आहे. यावरुन असे दिसते, की शकांकडून सातवाहनाचे राज्य जिंकण्यात आल्यावर सातवाहनानी त्यांची राजधानी जुन्नरहून पैठणला स्थलांतरीत केली. इ.स. 132 च्या सुमारास पुलुमावी गादीवर आला असावा. त्याने 28 वर्षे राज्य केले. त्याची कारकीर्द इ.स. 160 मध्ये संपली असावी. सातवाहनांच्या साम्राज्यावर एकछत्री अंमल करणारा तो अखेरचा सातवाहन नृपती होता. त्याच्या कारकीर्दीचा तपशील सांगणारे लेख नाशिक, कार्ले, वनवासी, अमरावती इ. ठिकाणी उपलब्ध आहेत. त्याची नाणी महाराष्ट्रभर सापडतात. त्याच्या कारकिर्दीत क्षत्रपांनी पुनः उठाव करुन नर्मदेचा भूप्रदेश व उत्तर कोकणचा प्रदेश जिंकुन घेतला. समकालीन ग्रीक साहित्यात त्याचे नांव आढळून येते.

वासिष्ठीपुत्र सातकर्णीनंतर यज्ञश्री सातकर्णी राजा बणला. पुराणांतील माहिती प्रमाणे यज्ञश्रीने एकोणतीस वर्षे राज्य केले असे वाटते. कृष्णा जिल्हयातील चिन या गावी सापडलेला लेख त्याच्या कारकिर्दीच्या सत्तावीसाव्या राज्यवर्षातील आहे. यावरुन त्याने जवळपास तीस वर्षे राज्य केल्याचे स्पष्ट होते. त्यांच्या साम्राज्यात पश्चिमी सागरापासून पूर्व समुद्रापर्यतचा विस्तृत भूप्रदेश समाविष्ट होता. या सागरावरील व्यापारात त्याचे वर्चस्व असल्याचे आंध्रात उपलब्ध झालेल्या त्याच्या दोन शिडांच्या जहाजाच्या नाण्यावरुन वाटते.[12]

सातवाहन घराण्यातील हा अखेरचा बलशाली नृपती होय. यज्ञश्रीचा मुखवठा असलेले नाणे अलिकडेच पैठण इथे उपलब्ध झाले आहे. यज्ञश्रीने साधारणपणे इ.स. 174 ते इ.स. 203 असे 29 वर्ष राज्य केले असावे. त्याच्यानंतर दोन दशकातच सातवाहन साम्राज्य ढासळले.

सातवाहनांची सत्ता ही भारताच्या इतिहासात अत्यंत महत्वाची ठरली आहे. सातवाहनांच्या आगमनाने महाराष्ट्राच्या राजकारणात स्थैर्य प्राप्त होउन महाराष्ट्राची आर्थिक समृद्धीकडे वाटचाल सुरु झाली. त्यातून आंतरराष्ट्रीय व्यापाराची पायाभरणी होउन महाराष्ट्राचे नांव आतंरराष्ट्रीय राजकीय आणि व्यापारी पटलावर नोंदले गेले. त्यांच्या कारकिर्दीपासूनच महाराष्ट्रावर एकछत्री अमंल सुरु झाला. सातवाहनानी इ.स.पू 230 ते इ.स. 230 अशी 460 वर्षे राज्य केले. इतका प्रदीर्घ कालखंड राज्य करणारे ते एकमेव राजघराणे असे म्हणावे लागेल. सातवाहन घराण्यात सातकर्णी पहिला, गौतमीपुत्र सातकर्णी, वाशिष्ठीपुत्र पुलुमावी, यज्ञश्री सातकर्णी यांचे सारखे महान सम्राट होउन गेले. या सम्राटांनी ''दक्षिणापथपति', तिसमुद्दतोयपीतवाहन'' ''अप्रतिहतचक्र'' अशाप्रकारची बिरूदे धारण करुन त्याद्वारे आपल्या सत्तेचे सामर्थ्य प्रदर्शित केले. त्यानी क्षत्रपाचे उच्चाटन करून महाराष्ट्रातील सामाजिक जीवनात शांतता प्रस्थापित केली. महराष्ट्राच्या उत्पादनाना आतंरराष्ट्रीय बाजारपेठातून स्थान मिळवून दिले. सांस्कृतिक जीवनात आणि कला क्षेत्रात सातवाहन कालखंडात महाराष्ट्रात नवीन पर्वाचा आरंभ झाला.

सातवाहन कालखंडात नाशिक, कार्ले, भाजे, कान्हेरी, जुन्नर, अजिंठा इथे शेकडो लेण्या खोदल्या गेल्या. काही स्तूपही बांधल्याचे सांगितले जाते.

### *संदर्भ*

1.Shastri Ajaymitra, The Early History of the Deccan, Problems and Prospectivies, Delhi, 1987, pp. 1-12.
2.Mirashi V V , The History and Inscriptions of the Satavahanas and the Western Kshatrapas, Bombay, 1981, pp, 2-9
3.पी जी सहस्त्रबुद्धे, महाराष्ट्र संस्कृती , पृ. 50–52
4.R G Bhandarkar, Early History of Deccan, p. 48.
5.Mirashi V V, op. cit. p. 18
6.Ibid
7.Mirashi V V, op. cit. pp 21-24.
8.Ibid
9.देव शां. भा, महाराष्ट्र व गोवे शिलालेख–ताम्रपटांची वर्णनात्मक संदर्भ सूची, आलेख क्र.595
10.Mirashi V V, op. cit. pp28-29
11.Mirashi V V, op. cit. Appendix No. III.
12.Mirashi V V, op. cit. p- 42

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org